IO प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** वजीराबाद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0452 **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/12/2022 22:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 23/12/2022
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/12/2022
**Time From (वेळेपासून):** 15:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/12/2022 **Time (वेळ):** 22:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/12/2022 22:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय ,नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): संतोष माधवराव पुयड

(b) Father's Name (वडील चे नाव) : माधवराव

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पासपोर्ट क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडगाव ,तूप्पा ,वजीराबाद,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडगाव ,तूप्पा ,वजीराबाद,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-7972803585

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | माणिक काशीराम बोधगिरे | | वडील का नाम : काशीराम | 1. नादेड ,नादेड ,वजीराबाद,नादेड, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रूपया | दोन हजार रूपये | 2,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 23/12/2022
फिर्याद
मी संतोष माधवराव पुयड, वय 36 वर्ष, व्यवसाय- शेती रा. वडगाव , पोस्ट तुप्पा, ता.जि. नांदेड
मो.क्र. 7972803585

समक्ष पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. मी दिनांक 19/12/2021 रोजी पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात तक्रार दिली होती की, माझी आई पार्वतीबाई माधवराव पुयड हिचे नावे वडगाव येथे गट क्र. 116 मध्ये सातबारा प्रमाणे एक एक्कर शेती आहे. तसेच आमच्या गावा मध्ये माझ्या आईच्या नावा सारखे पुर्ण नाव असलेली एक महिला असुन तीची पण शेत जमीन आहे.

माझे आईचे नावे आलेले शासकीय अनुदान माझे आईचे बँक खात्यात जमा न होता माझ्या आईच्या नावाशी साधर्म असलेल्या महिलेल्या बँक खात्यात जमा होत असल्याने माझे आईचे सातबारा वरील नावासमोर माळकरी असे टोपन नाव टाकण्यासाठी तहसिलदार, नांदेड यांना मी व माझे आईचे नावाने अर्ज दिला तसेच तलाठी श्री बोधगिरे यांना शपथपत्र दिले, मी दिलेल्या अर्जावरून तहसिलदार नांदेड यांनी तलाठी सज्जा वाजेगाव अंतर्गत वडगाव यांना नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी पत्र दिले. त्याची एक प्रत माझे आईच्या नावाने दिली ती आम्हाला प्राप्त झाली. त्यानंतर मी तलाठी बोधगिरे यांना माझ्या आईच्या सातबारा वरील नावा समोर माळकरी असे टोपणनाव टाकण्या संदर्भात भेटलो असता त्यांनी सातबारावर सदर नाव टाकण्यासाठी मला 3000/- रूपये लाचेची मागणी केली. वगैरे मजकुराची सविस्तर तक्रार दिली.

मी दिनांक 19/12/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय नांदेड येथे दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने दिनांक 20/12/2022 रोजी पो.नि. श्री कालीदास ढवळे यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेवुन मला दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगीतली. पंचानी माझी लेखी तक्रार वाचुन तक्रारीवर सहया केल्या आहेत. मी व पो.नि. ढवळे यांनी तक्रारीवर पुर्वीच सहया केल्या होत्या.

त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन माझे स्वतःचे, पोनि श्री ढवळे व दोन्ही पंचांचे परीचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर लोकसेवक श्री बोधगिरे यांचे भेटण्याचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी माझे मोबाईल वरून त्यांचे मोबाईलवर कॉल केला असता तलाठी श्री बोधगिरे यांनी मला म्हणाले ते तहसिलला आहेत, नोटीस उदया व्हॉटसअँप टाकतो, भेटायची गरज नाही, चार पाच वाजता फोन लावतो असे म्हणाल्याने ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे थांबुन त्यांचे फोनची वाट पाहीली परंतु त्यांचा फोन आला नसल्याने सदर दिवशीची कार्यवाही स्थगित करून पुढील कार्यवाही उदईक दिनांक 21/12/2022 रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिनांक 21/12/2022 रोजी दिलेल्या सुचना प्रमाणे ला.प्र.वि.कार्यालयात हजर आलो. कार्यालयात संपुर्ण सापळा पथक हजर होते. लोकसेवक श्री बोधगिरे यांचे भेटण्याचे ठिकाण निश्चीत करण्यासाठी माझे मोबाईलवरून त्यांचे मोबाईलवर कॉल केला असता तलाठी श्री बोधगिरे यांनी मला दोन वाजे पर्यन्त आजच्या तारखेत नोटीस भेटुन जाईल, थांब असे म्हणाल्याने ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे थांबण्याचा आणि तलाठी श्री बोधगिरे यांचे फोनची वाट पाहण्याचा निर्णय घेतला. परंतु तलाठी श्री बोधगिरे यांनी फोन केला नसल्याने सदर दिवशीची कार्यवाही स्थगित केली. दिनांक 22/12/2022 रोजी माळेगाव यात्रे निमित्त सुट्टी असल्याने व तलाठी कार्यालयात येण्याची शाश्वती नसल्याने पुढील कार्यवाही दिनांक 23/12/2022 रोजी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिनांक 21/12/2022 रोजी दिलेल्या सुचना प्रमाणे मी दिनांक 23/12/2022 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे आलो त्यावेळी पोनि ढवळे यांनी मला विचारले की, तलाठी श्री बोधगिरे हे कुठे भेटतील तेंव्हा मी त्यांना तलाठी



Scanned with OKEN Scanner

बोधगीरे हे तहसिल कार्यालय नांदेड येथे भेटतील असे सांगीतले .त्यानंतर पोनि ढवळे ,मी तसेच सापळा पथकातील पंच व सदस्यासह शासकीय चार चाकी वाहनाने लाप्रवि कार्यालय नांदेड येथुन निघुन अण्णाभाउ साठे चौकात येवुन सुरक्षित ठिकाणी थांबलो. सदर ठिकाणी पोनि ढवळे यांनी आम्हाला लाचमागणी संबधाने सुचना दिल्या. त्यानंतर मला तसेच पंच क्रमांक 1 सोनकांबळे यांना शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणा पासुन तहसिल कार्यालय, नांदेड येथे माझे मोटारसायकल क्रमांक एम एच 26 एएच 8340 वर पाठवुन तलाठी श्री बोधगिरे यांची भेट घेणेसाठी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन लाचमागणी पडताळणी केली असता तलाठी श्री बोधिगिरे यांनी माझे उपरोक्त कामा करीता मला तुला सांगितले होते की, असे म्हणून 3000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2000/- रू. घेण्याचे मान्य करून सदर लाचेची रक्कम लवकर घेवुन येणे बाबत सांगीतल्याने मी त्यांचेकडुन वेळ घेवुन शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथुन संपुर्ण सापळा प्रथक ला.प्र.वि.कार्यालय, नांदेड येथे येवुन प्रथम पंच क्रमांक 1 सोनकांबळे व नंतर मला विचारपुस करून रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण सर्वांनी ऐकले.

त्यानंतर तलाठी श्री बोधगिरे यांनी मला लाचेची रक्कम घेवुन तहसिल कार्यालय, नांदेड येथे बोलाविले असल्याने सापळा आयोजित करण्यापूर्वी ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथे सापळापुर्व कार्यवाही केली ज्यात मला व दोन्ही पंचांना अल्ट्राव्हॅयलेट लॅम्प व अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन माझी अंगझडती घेतली व मी हजर केलेले लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक नमूद केले, अल्ट्राव्हॅयलेट लॅम्प व अँथ्रासीन पावडर यांच्या वापराचे प्रात्यक्षिक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेचे वर्णन व क्रमांक पंच क्रमांक 1 यांचा कडुन एका कागदावर लिहुण घेवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावले व सदर रक्कम माझे अंगावरील नेसत्नीस असलेल्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवली व लाच स्विकारल्यानंतर करावयाचा इशारा मला सांगुन तशी सविस्तर सापळा पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर सापळा कार्यवाही संबधाने पो.नि. ढवळे यांनी सुचना देवुन ला.प्र.वि. कार्यालय, नांदेड येथुन मला तसेच पंच क्रमांक-1 श्री सोनकांबळे यांना तलाठी श्री बोधगिरे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय, नांदेड येथे माझे मोटारसायकलने माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पाठविले.व पथक शासकीय वाहनाने माझे पाठीमागे तहसिल कार्यालय येथे आले. मी व पंच क्रमांक 1 असे तहसिल कार्यालय, नांदेड येथे जावुन लोकसेवक तलाठी श्री बोधगिरे यांची महसुल शाखा येथे भेट घेतली असता तलाठी श्री बोधगिरे यांनी मला तहसिल कार्यालयाचे पाठीमागील गेटने बाहेर नेवुन त्यांचे स्वतःचे मोटार सायकलवर बसवुन पाठीमागुन तहसिल कार्यालयाचे मुख्य गेट समोर आणुन मला गाडीचे खाली उतरवुन लाचेची रक्कम त्यांचे मोटार सायकलचे पेट्रोलचे टाकीवर असलेल्या कव्हर मध्ये ठेवणे बाबत सांगीतल्याने मी सदर लाचेची रक्कम 2000/- रू. तलाठी श्री बोधगिरे यांचे ताब्यातील मोटार सायकलचे पेट्रोलचे टाकीवर असलेल्या कव्हर मध्ये ठेवुन तलाठी श्री बोधगिरे यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत ईशारा करताच आमचेवर लक्ष ठेवुन असलेले पो.नि.श्री ढवळे, पो.नि. श्री बोडके, पंच क्रमाक 2 व सापळा पथकातील सर्व सदस्य तेथे हजर येवुन तलाठी श्री बोधगिरे यांना 15:20 वाजताचे सुमारास पकडुन पुढील कार्यवाही केली.

तरी माझे दिनांक 19/12/2022 रोजीचे तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 23/12/2022 रोजी शासकीय पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाहीत तलाठी श्री बोधगिरे यांनी माझ्या आईच्या सातबारावरील नावासमोर मालकरी हे टोपननाव टाकण्या करीता 3000/- रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2000/- रूपये स्विकारण्यास सहमती देवुन सापळा कार्यवाही दरम्यान 15.20 वाजताचे सुमारास तहसिल कार्यालय, नांदेड परीसरात तलाठी श्री बोधगिरे यांनी माझेकडुन 2000/- रू. लाचेची रक्कम स्विकारून पदाचा दुरूपयोग करून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेतला म्हणुन लोकसेवक श्री माणिक काशीराम बोधगिरे, वय 47 वर्ष, व्यवसाय- नौकरी, पद- तलाठी, नेमणुक- तलाठी सज्जा वाजेगाव ता. जि. नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली सही

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): PI कोल्हारे 0496 सो. ACB नांदे[illegible]
JAGDISH RAJANNA BHANDARWAR(I (Inspector)) / POBN72704 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Sarfyed

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

[signature] PN 1350
**ठाणे अंमलदार**
पो.स्टे. वजिराबाद, नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): JAGDISH RAJANNA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72704



Scanned with OKEN Scanner